# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

जा. क्र. उमपा/अ.बां.नि.वि./१३० /२०२०.
दिनांक:- २६.०९.२०२०.

## जाहीर सूचना

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींना अधिनियमातील तरतुदीन्वये नोटीसा बजावलेल्या आहेत. तसेच अतिधोकादायक इमारती रिकाम्या देखिल केलेल्या आहेत.

शहरामध्ये गेल्या काही दिवसांत अतिधोकादायक इमारतींचे स्लॅब कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. सदरहु इमारती या मुख्य रस्त्यालगत व दाटीवाटीच्या क्षेत्रात असल्याने तातडीने निष्कासीत करणे आवश्यक आहे. अन्यथा कोणत्याही क्षणी इमारत कोसळून लगतच्या भागातील रहिवाश्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्या अतिधोकादायक इमारती रहिश्यांनी रिकाम्या केलेल्या आहेत त्या इमारती स्वत:हून निष्कासीत करण्यासाठी वारंवार नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. तथापी सदर इमारतींमध्यील सदनिकाधारक कोणत्याही प्रतिसाद देत नाहीत अथवा इमारती देखिल निष्कासीत करीत नाहीत. बरेच रहिवासी हे त्यांची सदनिका रिकामी करुन गेल्यानंतर त्यांचा सद्यस्थितीचा पत्ता देखिल उपलब्ध नाही.

उल्हासनगर शहरात अशाप्रकारे अतिधोकादायक झालेल्या इमारतींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | अतिधोकादायक इमारतीचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १ | मिलन दर्शन अपार्टमेंट | मे. चौहान किराणा स्टोअर्स, तळमला, जीरा चौक, उ. -२. |
| २ | हिरानंद अपार्टमेंट | डॉ. बसंतानी क्लिनिक समोर, भाजी मार्केट, उल्हासनगर -२. |
| ३ | सिंदरी सागर अपार्टमेंट | सपना गार्डन उल्हासनगर -२. |
| ४ | बालाजी अपार्टमेंट | मच्छी मार्केट, आवत चौक, उल्हासनगर -३. |
| ५ | जय कृष्णा मार्केट | बॅरेक नं. ५२० जवळ, उल्हासनगर-२ . |
| ६ | श्रीहरी कॉप्लेक्स | सन्मुख सदन जवळ, नेहरु चौक, उल्हासनगर-२. |
| ७ | चिमन टॉवर | भारत सिनेमा जवळ, उल्हासनगर -३. |
| ८ | वाधवानी अपार्टमेंट | बॅरेक नं. ५५२, कैलास हौ. सो. उल्हासनगर -२. |
| ९ | पेनुसुल्ला पार्क | सपना उदयान जवळ, उल्हासनगर -३. |
| १० | मिनिस्टर कॉम्पलेक्स | प्रांत ऑफिस जवळ, पवई चौक, उल्हासनगर -३. |
| ११ | रुपसागर अपार्टमेंट | राधास्वामी कोल्ड्रीक जवळ, काशामल रोड,उल्हासनगर -३. |
| १२ | जय मंगलमूर्ती अपार्टमेंट | सेक्शन २९, उल्हासनगर -४. |
| १३ | एम एन साळी | ब्लॉक नं. ए ७१४/१४४८, सहयाद्री नगर, उल्हासनगर-५. |
| १४ | मेमसाब अपार्टमेंट | बॅ. नं. ९९९ इंदिरा गांधी भाजी मार्केट जवळ, उल्हासनगर -३. |
| १५ | विरु सिंग आत्मासिंग सोढी | बॅरेक नं. ८५०/१, सेक्शन १८,उल्हासनगर -३. |
| १६ | जय गजानन मार्केट | जय गजानन मार्केट, भाजी मार्केट जवळ, गाऊन बाजार, उल्हासनगर -५. |
| १७ | पतपेढी, ज्ञानदिप विदयालय | ब्लॉक ए ४०४ समोर, आंबेडकर चौक, उल्हासनगर -४. |
| १८ | वाचनालय, ज्ञानदिप विदयालय | ज्ञानदिप विदयालय, ब्लॉक ए ४०४ समोर, आंबेडकर चौक, उल्हासनगर-४. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १८ | वाचनालय, ज्ञानदिप विदयालय | ज्ञानदिप विदयालय, ब्लॉक ए ४०४ समोर, आंबेडकर चौक, उल्हासनगर-४. |
| १९ | मुख्याध्यापक, होली चाईल्ड स्कूल | होली चाईल्ड स्कूल, दत्त निवास जवळ, बॅरेक नं. १७११ समोर, जिजामाता मराठी शाळेजवळ, उल्हासनगर-५. |
| २० | श्री. संतोष जाधव | बुध्द विहारासमोर, आम्रपाली नगर, सुभाष टेकडी, उल्हासनगर-४. |
| २१ | प्रथमेश अपार्टमेंट | पाटील रेशनच्या दुकानाच्या मागे, मेथोडिस्ट चर्च जवळ, सुभाष टेकडी, उल्हासनगर-४. |
| २२ | प्लाझा पॅलेस. | ब्लॉक नं. १८, राधा कृष्णा मंदिराजवळ, उल्हासनगर-५. |
| २३ | कोहिनुर पॅलेस | ब्लॉक नं. ए २९९/५९७, सेंट्रल पार्क हॉटेल जवळ, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर-४. |

उपरोल्लेखित अतिधोकादायक बहुमजली इमारतीमुळे लगतच्या परिसरातील नागरिकांच्या जिवास धोका होऊ शकतो यामुळे या इमारती तात्काळ नियमानुसार निष्कासीत करणे आवश्यक आहे. सदर इमारती हया पूर्णपणे रिकाम्या असून तेथे कोणीही वास्तव्य करुन राहत नाही.

सदर इमारती महापालिकेमार्फत नियमानुसार निष्कासीत करण्यात येणार असून इमारतींमधील रहिवाश्यांना याबाबत काहीही सूचना अथवा हरकत असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत प्रभाग समिती कार्यालयात लेखी स्वरुपात आपला अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

२४/९/२०२०

(डॉ. राजा दयानिधी) भा.प्र.से.
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

Scanned with CamScanner